## - संकीर्ण -

" संकीर्ण "

जीवन हे सुखदु:खमिश्रित असते. हा उनसावलीचा खेळ प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातच चाललेला असतो. मग ती व्यक्ती कितीही श्रीमंत असो वा गरीब, सशक्त असो वा अशक्त, हुशार असो वा मूर्ख, स्त्री असो वा पुरुष, या सुखदु:खाच्या कचाट्यातून कोणीही सुटत नाही. जीवनाचा मार्ग इतका सरळ नसतो. प्रत्येक व्यक्तीला कोणतीना कोणती चिंता ही असतेच. कोणाला पैशाची, कोणाला सत्तेची, कोणाला आरोग्याची तर कोणाला अन्य कांही, म्हणूनच रामदास म्हणतात की,

जगी सर्व सुखी असा कोण आहे
विचारी मना तूचि शोधूनि पाहे.

जीवनातील ही अस्थिरता कालिदासानेही ओळखली होती. प्रत्येक व्यक्तीचे जीवन हे अनंत अडचणींनी ग्रासलेले आहे, संकटांनी घेरलेले आहे हे त्याला माहित होते. म्हणूनच तो म्हणतो की,

"रन्ध्रोपनिपतिनोऽनर्था" इति यदुच्यते तदव्यभिचारि वच: ।
[अभि. शां. ६/ ]

- "संधी सापडली की संकटं धावून येतात असं जे म्हणतात ते अगदी खरं आहे."

आणि ही संकटे नुसतीं दु:खच माणसाला देत नाहीत तर त्याबरोबर अपमानही देतात, असे अग्निमित्र परिव्राजिकेच्या आयुष्याचा इतिहास ऐकल्यानंतर उद्गारतो. तो म्हणतो, "अहो ! परिभवोपहारिणो विनिपाता: ।" [मालविका. ५]

- "अरेरे, संकटे किती अपमान आणतात !" परिव्राजिकेसारख्या कुलीन व समृध्द स्त्रीच्या आयुष्याची झालेली दयनीय अवस्था ऐकून राजाने काढलेले हे उद्गार जीवनाची भीषण सत्यता प्रकट करणारे आहेत.

याच अर्थाचा आणखी एक श्लोक कालिदासाने दिलेला आहे. तो असा -

परिभवास्पदः दशाविपर्ययः ।। [विक्रमो. ४]

- "परिस्थिती बदलली असतां सगळीकडे अपमान होतो."

उर्वशीच्या वियोगाने भ्रमिष्ट झालेला पुरुरवा सृष्टीतील प्रत्येक गोष्टींत स्वपत्नीचे प्रतिबिंब पाहतो व त्यांना आपल्या प्रियेचा पत्ता विचारतो. अशाचप्रकारे हरिणाला आपल्या पत्नीविषयी पृच्छा करतांना ते जेव्हा राजाकडे पाठ फिरवते, तेव्हां राजा जे उद्गारतो त्या वरील श्लोकाचा भावार्थ एवढाच की, संकट आले असता कोणीच उपयोगी पडत नाही उलट सगळे पाठ फिरवून निघून जातात. जीवनाचे हे ही एक सत्य कालिदासाने याठिकाणी उलगडून दाखविले आहे.

आणि या संकटामध्ये दुःखावर फुंकर घालणारे आपले माणूस जर नसेल तर ते दुःख अधिकच तीव्र होते असे कालिदास म्हणतो -

"स्निग्धजनसंविभक्तं हि दुःख सह्यवेदनं भवति ।।[अभि. शां. ३]

- "मायेच्या माणसांनी दुःखाचा वाटा उचलला म्हणजे त्याची वेदना सहन करायला सोपे जाते." प्रियंवदा आणि अनसूया यांनी विरही शकुन्तलेच्या संदर्भात काढलेले हे उद्गार अगदी सार्थ आहेत.

अशा प्रकारचा दुःखाचा वाटा उचलणारे मायेचे मनुष्य परि-व्राजिकेला न भेटल्यामुळेच तिचे जीवन आणखी कष्टमय झालेले होते. दुःख हे मनांत कोंडून राहिले असतां माणसाला अतिशय त्रास होतो, व त्याला जर वाट करून दिली तर माणसाचे मन हलके होते. तसेच मायेचा मनुष्य भेटला की अशा प्रकारे दुःखाचा बांध फुटतो आणि माणसाचे मन हलके होते. ही मानवी मनाची असणारी प्रवृत्ती अचूक हुडकून काढून कालिदासाने ती पुढील श्लोकात मांडली आहे - तो म्हणतो,

स्वजनस्य हि दु:खमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते । [कुमार. ४/२६]

– "जिव्हाळ्याचा माणूस पाहिला की दु:खी माणसाचे दु:ख जणू काय बांध फोडून सैरावैरा धावू लागते." मदनाचा मित्र वसंत आलेला पाहतांच म्हणूनच रतीला रडू कोसळले.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. जीवन हे सुलभतेने जगण्यासाठी त्याला कुटुंबातील व्यक्तींच्याशिवाय इतरही जिव्हाळ्याच्या व्यक्तींची जरूर असते. हा विचारही कालिदासाने वरील श्लोकांतून व इतरही कांही श्लोकांतून व्यक्त केला आहे. यासंदर्भात पुढील श्लोक पहा.

"अतिमात्रभासुरत्वं पुष्यति भानो: परिग्रहादनल: ।
अधिगच्छति महिमानं चन्द्रोऽपि निशापरिगृहीत: ।।[मालविका अंक १/१३]

– "अग्नि सूर्याच्या कृपेमुळे तेजस्विता धारण करतो, चन्द्र देखील रात्रीच्या आश्रयानेच [महत्त्वाला चढतो] थोडक्यात प्रत्यक व्यक्ती दुसऱ्याच्या मदतीनेच उत्कर्षाप्रत पोचते."

म्हणजे कोणत्याही व्यक्तीच्या यशामध्ये त्याच्या बरोबर इतरही व्यक्तींचा वाटा असतो असे कालिदास म्हणतो. आणि फक्त मोठे यश मिळविण्यासाठीच नव्हे तर जीवनांत अनेक प्रकारच्या अडचणींना माणसाला तोंड द्यावे लागते. या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी सुध्दा प्रत्येकाला मदतीची आवश्यकता असते.

अर्थं सप्रतिबंधं प्रभुरधिगन्तुं सहायवानेव ।
दृश्यं तमसि न पश्यति दीपेन विना सचक्षुरपि ।।[मालविका-अंक १/९]

– "मदत असलेला [मनुष्य] च मध्ये अडथळे असलेला उद्देश साध्य करण्यास समर्थ असतो. डोळे असलेला देखील अंधारात दिव्याविनां पाहण्याजोगे [दृश्य] पाहू शकत नाही".

या श्लोकांतून कालिदासाला हेच सांगावयाचे आहे की, मनुष्य हा एकटा कोणतीही गोष्ट [इतरांच्या मदतीशिवाय] पूर्ण करू शकत नाही. त्याला कोणाचे ना कोणाचे तरी सहाय्य हे घ्यावेच लागते.

याही पुढे जाऊन पंचतंत्रात म्हटले आहे की,

एक: स्वादु न भुञ्जीत नैक: सुप्तेषु जागृयात् ।
एको न गच्छेदध्वानं नैकश्चार्थान्प्रचिन्तयेत ।।

[पंचतंत्र - अपरीक्षितकारकम - भारुण्डपक्षिकथा]

- "गोड वस्तूचा उपभोग एकट्याने घेऊ नये, सगळे झोपलेले असतांना एकट्या माणसाने जागे राहू नये, एकट्या माणसाने प्रवास करू नये, आणि कोणत्याही गूढ विषयावर एकट्याने विचार करूं नये."

याचा अर्थच असा की, कोणतीही गोष्ट एकट्याने केली असतां ती सरळ न होता त्यात अनेक संकटे येतात. म्हणून प्रत्येक बाबतीत माणसाने दुसऱ्याचे साहाय्य घ्यावे आणि सुखापेक्षा दु:खात माणसाला मदतीची आवश्यकता जास्त असते. तेव्हा माणसाचे इतरांबरोबर जिव्हाळ्याचे सम्बन्ध असले पाहिजेत. आयुष्यात कुटुंबातील व्यक्तींखेरीजसुध्दां इतरही मित्र-मैत्रिणी माणसाला असल्या पाहिजेत हेच कालिदासाला या सर्व श्लोकांतून सांगावयाचे आहे. याच मित्राचे महत्त्व सांगतांना कालिदास म्हणतो की,

"दयितास्वनवस्थितं नृणां न खलु प्रेम चलं सुहृज्जने ।" [कुमार. ४/२८]

- "एकवेळ स्वत:च्या प्रिय बायकोवरही माणसाचे प्रेम अस्थिर असते, पण तेच आपल्या मित्रावरचे त्याचे प्रेम मात्र कधीही ढळत नाही.

खरी मैत्री ही अशी अतूट असते. रतीने मदनदाहानंतर काढलेले हे उद्गार खरोखर रक्षा मैत्रीचे मर्म स्पष्ट करणारे आहेत.

आणि खरे मित्र हे कोणत्याही परिस्थितीत माणसाला सोडून जात नाहीत. आणि मित्र करायचे तरी कशासाठी,–

आपदर्थे धनमित्रसङ्ग्रहः क्रियते । [पंचतंत्र –अपरिक्षितकारकम् – चंद्रभूपति कथा]

– "संकटात उपयोग व्हावा म्हणून धन आणि मित्र यांचा संग्रह करावयाचा असतो." त्यामुळे संकटात उपयोगी पडतो तोच खरा मित्र. कारण खरा मित्र हा, मन्दायन्ते न खलु सुहृदामभ्युपेतार्थकृत्या: । [मेघदूत–पूर्व.३८]
– "खरोखर मित्राचे काम अंगावर घेतले म्हणजे मग त्यांत कोणी अंगचुकारपणा करीत नाही."

असा सावधानतेचा इशारा मेघदूतमध्ये यक्ष मेघाला देतो. तूं माझ्या पत्नीला माझा संदेश पोहचविण्याचे ठरवले आहेस, तर तू त्यात अंगचुकारपणा करणार नाहींस असे मला वाटते, असे यक्ष त्याला म्हणतो.

जगांत जिव्हाळ्याच्या माणसांच्या प्रमाणे आणखी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे ती म्हणजे पैसा. या पैशाशिवाय जगांत मनुष्य कोणतीही गोष्ट मिळवूं शकत नाही.

अर्थं विना नैव यशश्च मानं प्राप्नोति मर्त्योऽत्र मनुष्यलोके ।
असे पंचतंत्रात म्हटले आहे. म्हणूनच या जगांत माणसाला पैशाशिवाय मानसन्मान आणि कीर्ती मिळत नाही. [अपरीक्षितकारकम् – लोभाविष्टचक्रधरकथा] इतके पैशाला या जगांत महत्त्व आहे. हे पैशाचे महत्त्व ओळखून त्यासंबंधीचेही कांही विचार तत्त्वरुपाने कालिदास मांडतो. ते पुढीलप्रमाणे, तो म्हणतो,

कोशेनाश्रयणीयत्वमिति तस्यार्थसंग्रहः ।
अम्बुगर्भो हि जीमूतश्चातकैरभिनन्द्यते ।। [रघु. १७/६०]

– "द्रव्यभांडार असले म्हणजे मनुष्य आदरणीय होतो, म्हणून तो अतिथी

द्रव्यसंचय करीत असे. कारण मेघ पाण्याने भरलेला असला तरच चातक पक्ष्यांकडून त्याचे अभिनन्दन केले जाते.

याच अर्थाचा पुढील श्लोकार्ध पहा.

शरद्घनं नार्दति चातकोऽपि । रघु. सर्ग ५/१७

– " चातक झाला तरी कोरडया शरदऋतूतील मेघाची याचना करीत नाही "

या दोन उक्तींद्वारा पैशाचे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांत असणारे महत्त्व कालिदास स्पष्ट करतो.

हा पैसा माणसाला चांगले ही बनवतो आणि वाईट ही. पिढीजात पैसा असूनही सज्जन आणि नम्र असणारी माणसेही या जगांमध्ये दिसतात, उलट थोडयाशाही पैशाने उन्मत्त झालेली माणसेही आयुष्यांत आपल्याला भेटतात, आणि अशी पैशाने उन्मत्त झालेली, पैशाची धुंदी डोळ्यावर चढलेली माणसेच समाजांत अधिक असतात. अशा व्यक्ती आपल्या माणसांनाही ओळख देत नाहीत. अशा वैभवामुळेच दुष्यन्तराजा शकुंतलेला ओळखत नसावा व पत्नी म्हणून तिचा स्वीकार करत नसावा असे वाटल्यामुळे शार्ङ्गरव त्याच्या संदर्भात म्हणतो की,

"मूर्च्छन्त्यमी विकाराः प्रायेणैश्वर्यमत्तेषु । [अभि. शा. ५]

– " वैभवाने धुंद झालेल्या लोकांच्यामध्ये बहुधा असल्या विकृती प्रबळ असतात. "

अशा रीतीने कालिदासाने जीवनातील सर्वच बारीक सारीक गोष्टी-पासून अनेक महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत आपले विचार तत्त्वरूपाने मांडले आहेत. आणि ही तत्त्वे नुसती एकासमोर एक ठेवली असतां मनाला भिडली नसती. हे ओळखून निसर्गातील अनेक दृष्टान्ताद्वारा ती त्याने आपल्यासमोर मांडली आहेत. कालिदासासारख्या प्रतिभावान व्यक्तीलाच असे दृष्टान्त देणे शक्य आहे. इतरांना नाही.

या जगांत मनुष्य कोणतीही गोष्ट करतो ती स्वत:च्या बुध्दीनुसार, आपल्या मनाला वाटते म्हणून, पटते म्हणून. हे मानवी मन ही मोठी अजब गोष्ट आहे. हे मनच माणसाला सुष्ट किंवा दुष्ट बनवत असते. त्या त्या व्यक्तींवर झालेल्या संस्कारानुसार, संगतिनुसार हे मन घडत असते. मनुष्य जसजसा लहानाचा मोठा होत जातो त्याप्रमाणे त्याचे मनही विकसित होत जाते. त्याला नवनवीन विचार स्फुरतात. नवनवीन अभिरुची निर्माण होतात. आणि "व्यक्ती तितक्या प्रकृती" या न्यायाने या लोकांच्या आवडीनिवडीही भिन्न असतात. म्हणून कालिदास म्हणतो -

" भिन्नरुचिर्हि लोक:" रघु. ६/३०

- "निरनिराळ्या माणसांच्या निरनिराळ्या आवडीनिवडी असतात." आणि या वेगवेगळ्या आवडीनिवडीनुसार मन हे नवनवीन गोष्टींची रोज इच्छा धरत असते. फक्त शक्य असणाऱ्या गोष्टींच्याबद्दलच नव्हे तर अनेक अशक्य गोष्टींची सुध्दा ते इच्छा धरते. एवढेच नव्हे तर ती गोष्ट मिळविण्यासाठी धडपडत असते, या संदर्भात कालिदास म्हणतो -

" नास्त्यगतिर्मनोरथानाम् । विक्रमो. २

- "मनोरथांसाठी कांहीही अगम्य नाही."

राजा पुरुरवाने काढलेले हे उद्‌गार मनाचे वैशिष्ट्य दाखवणारे आहेत. समोर भूर्जपत्रावर कांही लिहिलेले पाहून अदृश्यस्मातील उर्वशीने तर हे प्रेमपत्र आपल्या समोर टाकले नसेल असा विचार विदूषकाने बोलून दाखविल्यावर त्यावर राजाने मांडलेला विचार वरील श्लोकांत दिलेला आहे. याच अर्थाचा आणखी एक श्लोक असा -

" मनोरथानामगतिर्न विद्यते । [कुमार. ५/६४]

- म्हणजे "मनोरथं कोणत्या ध्येयामागे लागतील हे सांगता यावयाचे नाही." [ती शक्यताशक्यतेचा फारसा विचार करीत नाहीत]

BARR. ... KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शंकरासारख्या तपस्वीला पती म्हणून मिळविण्याची पार्वतीची जिद्द पाहून कालिदासाने मानवी मनाच्या जबरदस्त इच्छाशक्तीविषयी काढलेले हे उद्गार अत्यंत योग्य आहेत. आधुनिक जगांत लागणारे नवनवीन शोध पाहतां कालिदासाचे हे उद्गार सार्थच वाटतात. पूर्वी चंद्र ही फक्त कविकल्पना होती, पण आज मनुष्य चंद्रावर जाऊन पोचला आहे. एवढेच नव्हे तर इतरही ग्रहांचा तो शोध घेत आहे. याशिवाय टी.व्ही., फ्रीज, विमान, इ. सर्वच नवीन शोधांचा विचार करतां मानवी मनाच्या आकांक्षेचे आश्चर्य वाटते. कारण मनच या नवनवीन सुखसाधनांचा प्रथम विचार करते आणि नंतर त्या गोष्टी प्रत्यक्षांत आणण्यासाठी प्रयत्नशील असते. आज जगांत जी तांत्रिक प्रगति जिकडे तिकडे दिसत आहे त्या सर्वांचे कारण मानवी मनाची ही अशक्य, अप्राप्य गोष्टी मिळविण्याची इच्छा होय. मनाला रथाची उपमा देण्याचे कारण मन हे रथाप्रमाणे वेगाने इतस्तत: भटकत असते. -

याच मनाला पुढील श्लोकांत उताराकडे वाहत जाणाऱ्या पाण्याची उपमा देतांना कालिदास म्हणतो,

क इप्सितार्थस्थिरनिश्चयं मन:
पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत् [कुमार. ५/५]

- "इच्छित वस्तू प्राप्त करण्याच्या बाबतीत दृढ संकल्प अथवा निश्चय करणारे मन आणि उताराकडे वाहणाऱ्या पाण्याला कोण अडवूं शकेल ?"

या पाण्याला आपण जितके अडवायचा प्रयत्न करूं तितके ते वेगाने वाहते, तद्वत मनाचेही आहे. त्याला आपण एखाद्या गोष्टीपासून परावृत्त करण्याचा जेवढा म्हणूनप्रयत्न करूं तेवढे ते त्या गोष्टीमागे धावते. मानवी मनाचा असणारा कालिदासाचा सूक्ष्म अभ्यासच यावरून दिसून येतो.

तसेच पुढे जाऊन कालिदास असे म्हणतो कीं, अशा इच्छिलेल्या

गोष्टींची प्राप्ती झाली की तो आनंद काय वर्णावा !

" अहा विरुध्दसंवर्धन ईप्सितलाभो नाम " विक्रमो. ३

– "इच्छित वस्तूंची प्राप्ती परिस्थितीत किती आश्चर्यकारक परिवर्तन घडवून आणते !" विरहाच्या अनंत यातना सोसल्यानंतर उर्वशीची पुनर्भेट झाल्यावर राजा पुरुरवाला सृष्टीमध्ये जो बदल जाणवला त्यावरून त्याने काढलेले हे उद्‌गार आहेत. तिच्या विरहावस्थेत ज्या गोष्टी त्याला दुःखदायक वाटत होत्या त्याच गोष्टी त्याला आता आनंदवर्धक वाटत आहेत. हा मानवी मनाचा परिणाम आहे. पाहिजे ती गोष्ट प्राप्त झाल्यानंतर त्याला जो आनंद होतो त्याचेच प्रतिबिंब त्याला संपूर्ण सृष्टीत दिसते. "मनी वसे ते स्वप्नी दिसे" हेच तत्त्व कालिदासाला याठिकाणी सांगावयाचे आहे.

अशा रीतीने प्रत्येक गोष्टीमधील तत्त्व शोधून काढण्याच्या त्याच्या या वृत्तीमुळेच त्याला "तत्त्वज्ञ कालिदास " म्हणणे योग्य होय.

याच मनाचे आणखी एक वैशिष्टय कालिदास सांगतो. ते म्हणजे, मनाला स्तुती प्रिय असते.

" स्तोत्रं कस्य न तुष्टये "[कुमार १०/९]

– "स्तुती कोणास संतोषदायक नाही !"

मानवाला तर ती प्रिय असतेच, पण देवाधिदेवांना सुध्दां ती प्रिय असते. म्हणूनच तर शंकरासारखा अत्यन्त उग्र देवसुध्दां अग्नीने त्याच्या केलेल्या स्तुतिमुळे संतुष्ट झाला.

अशा रीतिने कालिदासाने आजपर्यंत मोठमोठया विचारवंतानाही न उमगलेल्या या मनाचे अनेक पापुद्रे आपल्या हळुवार लेखणीने उलगडून दाखविले आहेत.

हे मानवी मन नवनवीन गोष्टींची आशा धरते हे खरे, पण ती गोष्ट प्राप्त होण्यासाठी माणसानी आळस सोडून प्रयत्न केला पाहिजे ना ? अन्यथा त्या गोष्टीची प्राप्ती माणसाला कशी होईल ? कारण,

उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः ।

– "उद्योगानेच कार्ये सिध्दीला जातात, नुसत्या मनोरथाने नव्हे".

तेव्हां कार्यात यश मिळवावयाचे असेल तर माणसाने कष्ट केले पाहिजेत. यशस्वी जीवनाची ही गुरुकिल्ली सांगतांना कवि म्हणतो –

" कार्येष्ववश्यकार्येषु सिध्दये क्षिप्रकारिता । कुमार १०/२५

– "तातडीने करावयाच्या जरुरीच्या कामांत जर यश हवे असेल तर आळसांत वेळ दवडून चालावयाचे नाही".

" आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ।

– "आळस हा माणसाच्या शरीरामध्ये असणारा मोठा शत्रू आहे". त्यामुळे माणसाने आळस झटकून कामाला लागले पाहिजे असे कालिदासाचे मत आहे. कारण "थांबला तो संपला" असे म्हटले जाते. म्हणजेच माणसाने सतत कार्यरत असले पाहिजे. "कुमारसंभवांतील" वरील श्लोकार्धात कालिदास उद्योगाचे महत्त्व आपल्याला सांगतो. शंकराने टाकलेल्या वीर्याने होणारा अंगाचा दाह कमी करण्यासाठी अग्नीला इंद्र गंगास्नान करण्यास सांगतो व आळसांत वेळ न दवडता ही गोष्ट करण्यास सांगतो. या संदर्भात कालिदास या उद्योगाचे महत्त्व प्रतिपादन करतो.

अशा रीतीने खूप कष्टानंतर एखाद्या गोष्टींत यशप्राप्ती झाली असतां मनुष्याला मागचे सर्व कष्ट ती विसरायला लावते. या संदर्भात कालिदास म्हणतो,

" क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते । [कुमार, सर्ग ५/८६]

– "कार्यसिध्दीसाठी पडलेले क्लेश, कार्य सिध्द झाल्याने कार्यकर्त्याला नवीन जोम आणतात".

म्हणजेच कार्यसिध्दीच्या आनंदात मनुष्य मागचे सर्व कष्ट विसरतो, आणि दुप्पट उत्साहाने कामाला लागतो.

या सर्व श्लोकांतून माणसाने आळस सोडला पाहिजे व कष्ट केले पाहिजेत, कारण "कष्टाविनं फळ नाँ मिळते" हेच तत्त्व कालिदासाला येथे सांगावयाचे आहे. प्रत्येक बाबतीतून "तत्त्व" शोधून काढण्याचा त्याचा हा गुण येथेही दिसून आल्याशिवाय राहात नाही. म्हणून तर आपण त्याला "तत्त्वज्ञ" म्हणतो.

कालिदासाच्या चरित्राबाबत असे अनुमान काढले जाते कीं, त्याच्या आयुष्याचा बराच काळ राजदरबारी गेला असावा आणि ही गोष्ट त्याच्या ग्रंथावरून आपल्याला स्पष्टपणे दिसून येते. राजकुळांतील निरनिराळ्या व्यक्ती, त्यांचे आचार-विचार, चालिरीती, या सर्व गोष्टी त्याच्या प्रत्यक्ष परिचयाच्या होत्या हे त्याच्या नाटकांवरून आपल्याला समजते. [ या सर्वांवरून तो विक्रमादित्य राजाच्या दरबारी असावा असे म्हटले जाते. ] अशा रीतीने राजदरबाराशी जवळून सम्बन्ध आल्याने कालिदासाने तद्विषयक आपली कांही मते ही कथेच्या अनुरोधाने मांडलेली आपल्याला दिसतात. उदा. राजा कसा असावा ? त्याच्यामध्ये कोणते गुण असावेत? त्याचे आपल्या सेवकांशी सम्बन्ध कशा प्रकारचे असावेत ? आपल्या सेवकांकडून त्याने कोणत्या पध्दतीने कामे करवून घ्यावीत ? जवळच्या राष्ट्रांशी त्याचे सम्बन्ध कोणत्या प्रकारचे असावेत ? इ.

राजा हा परमेश्वरी अंश आहे असे मानले जाते. परमेश्वराप्रमाणेच सर्वांचे कल्याण करणे हे त्याचे काम आहे. तेव्हा सर्व प्रजेचे सुख ज्याच्या हातामध्ये आहे तो राजा कसा असावा याबद्दल कालिदास म्हणतो,

कातर्यं केवला नीतिः शौर्यं श्वापदचेष्टितम् ।
अतः सिध्दिं समेताभ्यामुभाभ्यामन्वियेष सः ।। रघु. १७/४७

– " केवळ नीति हा भित्रेपणा होय आणि केवळ शौर्य पशुतुल्य होय. म्हणून तो अतिथी नीति आणि शौर्य या दोहोंनी युक्त असलेली जयप्राप्ती इच्छिता झाला. "

राजा मध्ये या दोन्हीं गोष्टी म्हणजे नीति आणि पराक्रम एकत्रितपणे असल्या पाहिजेत, तरच त्या दोन्ही गोष्टी राजाची शोभा वाढवतील. नुसती एक गोष्ट त्याच्या अपयशांतच भर घालणारी आहे असे कालिदासाला वाटते. अतिथी राजाच्या संदर्भात त्याने आपले हे मत प्रकट केले आहे.

तसेच पराक्रमाबरोबर आणखी एक गुण राजामध्ये असणे अत्यन्त आवश्यक आहे तो म्हणजे विनय. म्हणून कालिदास म्हणतो –

" अनुत्सेक: खलु विक्रमालङ्कार: । " विक्रमो. १

– "विनय हा पराक्रमाचा अलंकार आहे." केशी राक्षसाच्या तावडीतून आपण उर्वशीची सुटका केल्याचे श्रेय तो पुरुरवा जेव्हा इंद्राला देतो, तेव्हा त्याच्या विनयावर खूष होऊन चित्ररथाने हे उद्‌गार काढले आहेत.

मनुष्य अनेक गुणांनी युक्त असला तरी तो जर घमेंडखोर, गर्विष्ठ असेल तर ते सर्व गुण असून नसल्यासारखे असतात. त्याच्या गर्विष्ठपणामुळे समाज त्याच्या गुणांना किंमत देत नाही. उलट त्याला वाळीत टाकतो. म्हणून या सर्व गुणांच्या बरोबर नम्रता असणे आवश्यक आहे. सर्वसामान्यांच्या बाबतीतच नाही तर राजाला सुध्दां हे विधान लागू आहे. राजा हा पराक्रमी असलाच पाहिजे, त्याशिवाय त्याचा टिकाव लागणारच नाही. पण त्याबरोबरच विनय हा ही त्याच्या जोडीने त्याच्याजवळ असणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे अलंकारामुळे माणसाचे सौंदर्य वृध्दिंगत होते त्याप्रमाणे विनयरूपी अलंकारामुळे पराक्रमाचे सौंदर्य अधिक उंचावते असे कालिदासाला वाटते. यामुळे त्याच्या कीर्तींत भरच पडते असे तो म्हणतो. या संदर्भात आणखी एक श्लोक असा –

निर्जितेषु तरसा तरस्विनां शत्रुषु प्रणतिरेव कीर्तये ।। [रघु. ११/८९]

– "बलवंताची बलाच्या जोरावर जिंकलेल्या शत्रूंनादेखील केलेली नमस्कृती कीर्तीलाच कारण होते."

यामुळेच सीता स्वयंवरानंतर परशुरामाने दिलेले धनुष्य मोडल्यामुळे संतापलेल्या परशुरामाचा पराभव जरी रामाने केला तरी, त्यांच्या-बद्दलचा मनांत असलेला आदर व्यक्त करण्यासाठी त्यांचा चरणस्पर्शही केला. ही त्याची कृती त्याच्या कीर्तीत भर टाकणारीच ठरली.

म्हणजेच नीती, पराक्रम आणि विनय या तीनही गोष्टी राजाजवळ एकत्रितपणे असल्या पाहिजेत असे कालिदासाचे मत या सर्व श्लोकांवरुन दिसते.

या राजाने आपल्या शत्रूबरोबर कसे वागावे याबद्दलच्या कांही सूचनाही कवीने आपल्या ग्रंथात देऊन ठेवल्या आहेत. या संदर्भात "मालविकाग्निमित्रम्" या नाटकांत तो म्हणतो –

" अचिराधिष्ठितराज्य: शत्रु: प्रकृतिष्वरुढमूलत्वात् ।
नवसंरोहणशिथिलस्तरुरिव सुकर: समुध्दर्तुम् ।। मालविका १/८

– "नुकताच राज्यावर बसलेला शत्रु प्रजेमध्ये पाळेमुळे रुजलेली नसल्याने, नुकतेच रोवल्याने ढिले असलेल्या झाडाप्रमाणे उखडून टाकण्यास सोपा असतो."

राजनीतीशास्त्राचा कालिदासाचा किती सूक्ष्म अभ्यास होता हेच यावरून आपल्याला दिसते. छोटया रोपटयाच्या साहाय्याने राज-नीतीतील एक तत्त्व त्याने किती सुंदर रीतीने पटवून दिले आहे.

शत्रूचा पराभव करण्याचे आणखी एक नेमके तत्त्व कालिदास सांगतो. ते म्हणजे,

रुरोध संमुखवीनो हि जयो रन्ध्रप्रहारिणाम् ।। रघु. १५/१७

- "शत्रूचे छिद्र पाहून त्यावर जे आघात करतात त्यांच्यापुढे जय हात जोडून उभा असतो."

याचा अर्थच असा की, कोणतीही गोष्ट योग्य काळवेळ पाहूनच केली असता ती सफल होते. हे तत्त्व सांगतांना कालिदास म्हणतो की-

काले खलु समारब्धा: फलं बध्नन्ति नीतय: ।। [रघु. १२/६९]

- "योग्य वेळी लढविलेले डावपेच सफल झाल्याशिवाय राहात नाहीत."

या दूरदृष्टीनेच मदतीचा हात पुढे करून आलेल्या बिभीषणाला राक्षसांचे आधिपत्य देण्याचे रामाने कबूल केले, असे कालिदास म्हणतो.

शत्रूंच्याप्रमाणे राजाने मित्रराष्ट्रांशी कसे वागावे त्याबाबतचे आपले मतही कालिदासाने सांगितले आहे. अतिथी राजाच्या संदर्भात हा श्लोक आलेला आहे.

हीनान्यनुपकर्तॄणि प्रवृद्धानि विकुर्वते ।
तेन मध्यमशक्तीनि मित्राणि स्थापितान्यत: ।। [रघु. १७/५८]

- "तो अतिथी राजा, हलक्या स्थितीत असलेले मित्र [मित्रराष्ट्रे] उपकारांची फेड करू शकत नाहीत, व उच्च स्थितीत असलेले मित्र अपकार करतात, म्हणून त्याने आपले मित्र [मित्रराष्ट्रे] मध्यम स्थितींत ठेवली."

राजांनी मित्रराष्ट्रांना आपल्यापेक्षा उच्च किंवा नीचही लेखू नये. त्यांना आपल्या बरोबरीच्या स्थानांतच ठेवावे, हे महत्त्वाचे राजनीतीतील तत्त्व कालिदासाने येथे सांगितले आहे.

कालिदास म्हणतो की, राजाला स्वकार्य [इच्छित कार्य] साध्य होण्यासाठीं पुढील २ गोष्टींची आवश्यकता असते. एक त्याची बुध्दी अव्याहत शास्त्रात असली पाहिजे व दुसरी गोष्ट म्हणजे त्याचे धनुष्य सतत सज्ज असले पाहिजे.

या सर्व श्लोकांच्या साहाय्याने कालिदासाने राजनीतिविषयक जी तत्त्वे आपल्या ग्रंथात नमूद केली आहेत ती कोणत्याही काळांत उपयोगी पडणारी असून राजांनी वा राज्यकर्त्यांनी ती लक्षांत ठेवून त्याप्रमाणे आचरण्यासारखी आहेत.

राजे लोकांचे आयुष्य हे स्वसुखासाठी नसून प्रजेच्या सुखासाठी, राज्याच्या अभिवृध्दीसाठी असते. पण ही गोष्ट रघुवंशातील राजांच्या-प्रमाणे फार कमी राजे जाणतात. बाकी राजेलोक राज्य हे स्वसुखासाठी, स्वउपभोगासाठी मानून त्याचा आनंद लुटत राहतात. ही गोष्ट कालिदास पुढील श्लोकांतून सूचित करतो.

सुखानि सोऽभुङ्क्त सुखोपरोधि वृत्तं हि
राज्ञामुपरुद्धवृत्तम् ।। [रघु. १८/१८]

- "कारण राजेलोकांचे आयुष्य बंदिवानाप्रमाणे सुखोपभोगाला आचावलेले असते." ते या ऐषआरामात इतके गुंतून पडतात की, आपले कर्तव्यही विसरतात हेच परियात्र राजाच्या संदर्भात कालिदास सांगतो.

राज्य हे केवळ एकटया राजावर, त्याच्या वागण्यावर अवलंबून नसते तर ते सुरळीतपणे चालावे यासाठी इतर अनेक घटकांची आवश्यकता असते. या अनेक घटकांपैकी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे सेवक होय. किंबहुना या सेवकवर्गावरच राज्याची किंवा एखाद्या संस्थेची उभारणी होते. हा सेवकवर्ग जितका उत्साही, कष्टाळू, तत्पर तितका त्या राज्याचा वा संस्थेचा उत्कर्ष अधिक होतो. तो जर आळशी, उध्दट, असेल तर ते राज्य वा ती संस्था लौकरच नष्ट होते. म्हणजे विशेषत: या सेवकवर्गावरच राज्याचे वा संस्थेचे भवितव्य अवलंबून असते. स्वामी आणि सेवक सम्बन्धावरच एखाद्या राज्याची वा संस्थेची उभारणी होत असते. हे सम्बन्ध चांगले, माणुसकीवर आधारलेले असतील तर ठीक व जर

या दोघांच्यात परस्परांत बेबनाव असेल, मतभेद असतील तर त्याचे रुपांतर संप, उपोषण, मोर्चा, निषेध या स्वरुपात होऊन राज्य वा संस्था लयास जाते. हे आज जगांत क्षणोक्षणी चाललेल्या संप, मोर्चा इ. वरुन आपल्या सर्वांच्या सहज लक्षात येईल.

तेव्हा या स्वामी व सेवक या दोघांचे सम्बन्ध कशा प्रकारचे असावेत या संदर्भातही कालिदासाने आपली मते लिहून ठेवलेली आहेत. ही मते ही अत्यंत अभ्यासपूर्वक त्याने लिहीली आहेत. तो राजदरबारात एक सेवकच असल्यामुळे कदाचित् स्वानुभवावरुन लिहिली असावीत असे वाटते.

सेवकाला स्वामीकडून एखाद्या गोष्टीची अपेक्षा असेल तर त्याने ती मागणी स्वामीजवळ केव्हां करावी म्हणजे ती फलद्रूप होईल हे सांगतांना तो म्हणतो,

" कालप्रयुक्ता खलु कार्यविद्भिर्विज्ञापना भर्तृषु सिध्दिमेति ।
[कुमार ७/९३]

– "खऱ्या कार्यज्ञ माणसाने योग्य काळी, प्रभूला केलेली विज्ञापनाच सिध्दीस जाते". म्हणजे काळ वेळ पाहूनच कोणतीही गोष्ट माणसाने करावी. स्वामी प्रसन्नचित्त असतां त्याच्याजवळ केलेली मागणी ही लगेच पूर्ण होते, हे मानवी स्वभावाचे सूक्ष्म ज्ञान असणाऱ्या कालिदासाने हेरले होते. म्हणूनच मागणीचे हे तत्त्व कालिदासाने जाणले, आणि आपल्या ग्रंथात ते नमूद केले. अशा प्रकारे प्रसन्नचित्त असलेल्या शंकराजवळ त्याच्या विवाहानंतर सर्व देवांनी "मदनाची सेवा आता स्वीकारा" अशी विनंती केली व शंकराने लगेच ती मान्यही केली.

याच अर्थाचे आणखी एक वचनही "कुमारसंभवात" आले आहे ते असे,

"भवन्ति वाचोऽवसरे प्रयुक्ता ध्रुवं फलाविष्टमहोदयाय ।।
[कुमार १२/४३]

– "योग्य प्रसंग पाहून केलेले बोलणे निश्चितपणे फलप्रद होते".

याचा अर्थच असा की, मापसाने नेहमी संधी येण्याची वाट पाहिली पाहिजे. कोणतीही गोष्ट करण्याची वा बोलण्याची गडबड करू नये. संधी येताच ती गोष्ट केल्यास ती निश्चितपणे यशस्वी होते.

तसेच मानवी स्वभावाचा आणखी एक गुण कालिदासाने हेरला आहे. तो म्हणजे स्तुति.

" स्तोत्रं कस्य न तुष्टये ?

– म्हणजे "स्तुति कोणाला प्रिय नाही ?" ती सर्वानाच प्रिय असते. ही स्तुति केली असतां कोणतेही काम मग ते कितीही अडचणींनी युक्त असो या स्तुतीच्या व कौतुकाच्या बळावर मनुष्य क्षणांत ते करतो. मेघदूतात यक्षानेही मेघाची प्रथम स्तुति करुन नंतर त्याचा सत्कार केला आहे. ते एवढयासाठीच. तेव्हां या मानवी प्रवृत्तीचा उपयोग स्वामींनी सेवकाच्या बाबतीत करुन घेतला पाहिजे. अशा प्रकारे त्या सेवकांच्या गुणांची कदर केली, त्याचा गौरव केला तर तो सेवक स्वामीचे कोणतेही काम चटकन करतो. अर्थात त्या सेवकाच्या कार्यातील यशांत महत्त्वाचा वाटा असतो तो स्वामीचा. हे सांगताना कालिदास म्हणतो,

" सिध्दयन्ति कर्मसु महत्स्वपि यन्नियोज्या:
संभावनागुणमवेहि तमीश्वराणाम् ।। अभि. शां. ७/४

– "सेवकांना अतिशय अवघड कार्यात सुध्दा यश मिळते, हा त्यांचे धनी त्यांचा जो बहुमान करतात त्याचाच प्रभाव होय."

स्वामींच्या कौतुकाने सेवकाचे मानसिक बळ वाढते आणि तो आपल्या कार्यात यश मिळवू शकतो असे कालिदास म्हणतो. आणि याच कारणास्तव आपल्या पराक्रमाचे श्रेय राजा दुष्यन्त इंद्राला देतो.

या संदर्भात आणखीही एक श्लोक कालिदासाने दिला आहे तो असा –

" प्रयोजनापेक्षितया प्रभूणां प्रायश्चलं गौरवमाश्रितेषु ।। [कुमार ३/१]

– "आपल्या सेवकांकडून ज्या मानाने कमी अधिक काम करून घ्यावयाचे असेल त्या मानानेच मालकाची त्याच्याबद्दलची गौरवबुध्दी कमीअधिक होत असते. "

म्हणजेच एखादे सर्वसामान्य काम जे सर्वच सेवकांच्याकडून होण्या-सारखे असेल तर त्याबद्दल सेवकाची फार स्तुति करण्याचे कारण नाही. पण एखादे काम त्या विशिष्ट सेवकांकडूनच होण्यासारखे असेल तर ते काम त्या सेवकाला अभिमानास्पद [असते] वाटते व स्वामीलाही या गोष्टीची जाणीव असल्यामुळे तो त्याची विशेष स्तुति करतो. शंकराच्या मनांत पार्वतीविषयी अभिलाषा निर्माण करण्याचे काम असेच अवघड व अनन्य-साधारण होते. मदनाशिवाय इतरांच्याकडून ते होण्यासारखे नव्हते ही गोष्ट जाणून मदनाला इंद्राने गौरविले व त्याच्यावर ते काम सोपविले. या संदर्भात कालिदास म्हणतो –

"अप्यप्रसिध्दं यशसे हि पुंसामनन्यसाधारणमेव कर्म ।" [कुमार ३/१९]

– "एखादे काम अगदी क्षुल्लक कां असेना पण एका विशिष्ट माणसांवाचून दुसऱ्या कोणाकडूनही ते होण्यासारखे नसेल तर ते त्या माणसाच्या कीर्तीला कारणीभूत होते." मदनाकडे सोपविलेले हे काम त्याच्या गौरवाला कारण झाले ते एवढयासाठीच. त्यामुळे त्याचे अनन्यसाधारणत्व सिध्द झाले.

आणि मुख्य म्हणजे अशा प्रकारचे एखादे काम आपल्यावर सोपवावे असे सेवकांनाही वाटत असते.

विनियोगप्रसादा हि किंकरा: प्रभविष्णुषु ।। [कुमार ६/६२]

– "दासांना कांही काम करावयास सांगणे हाच प्रभूंचा त्यांच्यावरील कृपाप्रसाद होय."

यामुळे स्वामीचा सेवकांवरील विश्वासच व्यक्त होतो असे कालिदासाला वाटते. स्वामींचे एखादे काम आपल्याकडून होण्यासारखे

आहे याचाच आनंद सेवकांना असतो. असे काम शिष्यांनाही गुरूनी आपल्यावर सोपवावे असे वाटते. यामध्ये आपल्या कर्तृत्वाला आव्हान असते, आणि आपण स्वामींसाठी कांही करू शकतो याचे समाधान असते. याच कारणास्तव हिमालय हा आपल्याकडे आलेल्या सप्तर्षींच्यापुढे नम्र होऊन "मला आज्ञा करा" असे म्हणतो.

कालिदासाने राजनीतीशास्त्रातील दिलेली ही तत्त्वे मानवी स्वभावाला अनुसरून असून त्याचा याविषयीचा सूक्ष्म अभ्यास व्यक्तच करणारी आहेत. या तत्त्वांचा आजही राज्यकर्त्यांनी तसेच सेवकांनीही आपल्या कार्यात उपयोग करून घेतल्यास राज्य सुरळीतपणे चालण्यास त्याचा उपयोग होईल असे वाटते.

कालिदासाचे बहुतेक सर्व नायक हे राजे असून ते बुध्दिमान, सुंदर व पराक्रमी आहेत. थोडक्यात, नायकांमध्ये आवश्यक असणाऱ्या सर्व गुणांनी ते युक्त आहेत आणि हे त्यांचे सर्व गुण लहानपणांपासून त्यांच्या-मध्ये प्रकर्षाने जाणवतात. रघूने अत्यंत लहानवयातच आपल्या पित्याने केलेल्या अश्वमेध यज्ञातील अश्व पळवून नेणाऱ्या इंद्राबरोबर युध्द करून त्याला चकित करून सोडले. विश्वामित्रासारख्या महान ऋषींनीही यज्ञकर्माला विघ्न उपस्थित करणाऱ्या राक्षसांचा नायनाट करण्यासाठी दशरथाकडे छोटया रामाची मागणी केली. सुदर्शन राजा हा लहान वयातच गादीवर बसला आणि लहान वयात सुध्दा "महाराज" या शब्दाला तो लायक होता. दुष्यन्त- शकुंतलापुत्र भरत हा बालवयांतच सिंहाबरोबर खेळताना दुष्यन्ताने पाहिला आणि पुरुरवा - उर्वशी पुत्राने गृध्र पक्ष्याला बाण मारून त्याला खाली पाडले. या सर्वांचे हे लहान वयांतीलच पराक्रम पाहतां आपल्याला आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. या सर्वांवरून एक गोष्ट लक्षांत येते की, माणसाचे तेज वा पराक्रम हा वयांवर अवलम्बून नसतो तर तो उपजतच असतो, ही गोष्ट आपल्याला अनेक महात्म्यांची चरित्रे वाचली असतां सहज लक्षांत येते. शंकराचार्यांचा वयाच्या

८ व्या वर्षीच सर्व वेद, उपनिषदे, स्मृतीग्रंथ इ. चा अभ्यास होता. तर ज्ञानेश्वरांनी वयाच्या १६ व्या वर्षीच "ज्ञानेश्वरी" हा आपला ग्रंथ लिहिला. याचा अर्थच असा की, कांही व्यक्ती या उपजतच बुध्दिमान किंवा पराक्रमी असतात. या संदर्भात कालिदासाने पुढील कांही श्लोक दिलेले आहेत. त्या सर्वांवरून हाच अर्थ व्यक्त होतो. -

तेजसां हि न वय: समीक्ष्यते । [रघु. ११/१]

- "बरोबरच आहे, जे तेजस्वी असतात त्यांच्याजवळ वयाचा प्रश्न नसतो." या संदर्भात मराठीत एक श्लोक आहे तो असा -

तेजस्वी जे वृत्ति ऐशी तयांची ।
तैथे कांही चाड नाही वयाची ।।

हेच तत्त्व कालिदासाने इंद्रनील मण्याच्या उदाहरणाने पटवून दिले आहे. तो म्हणतो,

मणौ महानील इति प्रभावादल्पप्रमाणेऽपि यथा न मिथ्या ।।
[ रघु. १८/४२ ]

- "लहान आकाराचा असूनही इन्द्रनील मण्याच्या बाबतीत त्याच्या अतिशय तेजामुळे ज्याप्रमाणे "महानील" हा शब्द निरर्थक ठरत नाही" [त्याप्रमाणे हा सुदर्शन राजा लहान असूनही "महाराज" असा शब्द त्याच्या बाबतीत निरर्थक योजण्यांत आला नव्हता.]

पुढील श्लोकांमध्ये हत्ती आणि सापाच्या उदाहरणाद्वारे कालिदास आपले हेच तत्त्व स्पष्ट करतो, तो म्हणतो,

शमयति गजानन्यान् गन्धद्विप: कलभोऽपि सन् ।
भवति सुतरां वेगोदग्रं भुजङ्गशिशोर्विषम् ।
भुवमधिपतिर्बालावस्थोऽप्यलं परिरक्षितुं
न खलु वयसा जात्यैवायं स्वकार्यसहो भर: ।। विक्रमो. ५/१८]

- “गजराज वयाने लहान असून सुध्दा दुसऱ्या हत्तींना पराभूत करतो, सापाच्या पिल्लाचे सुध्दा विष खूप जहाल असते, तू लहान असूनही पृथ्वीचे पालन करु शकतोस, तेज हे वयावर अवलम्बून नसते.

याच संदर्भात आलेला “कुमारसंभवातील” श्लोक पहा.

न धर्मवृध्देषु वयः समीक्ष्यते ।। कुमार सर्ग ५/१६

- “धर्मवृध्द व्यक्तीच्या बाबतीत वय पाहिले जात नाही.”

या सर्वांचा अर्थ एकच की, माणसाचे कर्तृत्व, त्याची बुध्दिमत्ता वा त्याचा पराक्रम हा वयावर अवलम्बून नसतो. लहान वयांत सुध्दा या गोष्टी कांहीच्या मध्ये प्रकर्षाने दिसून येतात. या बाबतीत एक शक्यता मात्र कालिदासाने बोलून दाखविली आहे. ती म्हणजे, अशी बुध्दिमान वा पराक्रमी व्यक्ती हीसहजासहजी आणि कुठेही जन्माला येत नाही तर तिचा जन्म हा तशाच तेजस्वी कुळांत झालेला असतो. या संदर्भात कालिदास म्हणतो,

रत्नाकरे युज्यत एव रत्नम् ।। [कुमार ११/११]

- “रत्नाचा जन्म सागरकुक्षीतून व्हावा हेच उत्तम.” म्हणजे कुमार कार्तिकेयासारख्या पराक्रमी वीराचा जन्म हा शंकर-पार्वतीसारख्या महान देवतांच्या पोटी होणेच योग्य होय. अशी उपजतच कर्तृत्ववान व्यक्ती जन्माला येण्यास त्यांच्या पूर्वजांची पिढयानपिढयांची पुण्याई ही साठलेली असते.

असे असले तरी कालिदास आणखी एक गोष्ट याठिकाणी नमूद करतो. ती म्हणजे, नुसत्या मोठ्या घराण्यांत जन्माला आल्यामुळे एखादी व्यक्ती मोठी ठरत नाही, तर तिच्यावर चांगले संस्कारही व्हावे लागतात. याबाबतीत कालिदास म्हणतो,

अप्याकरसमुत्पन्ना मणिजातिरसंस्कृता ।
जातरूपेण कल्याणि न हि संयोगमर्हति ।। मालविका. ५/१८

– "हे कल्याणि, खाणीतून असूनही रत्नांची जात संस्कार झाल्याशिवाय सोन्याशी संयुक्त होण्यास योग्य नसते."

जगामध्ये संस्काराला असणारे महत्त्वच कालिदासाने या श्लोकातून व्यक्त केले आहे.

म्हणजे काही व्यक्ती उपजतच कर्तृत्ववान निपजतात. पण त्यामागे त्यांच्या पूर्वजांची पुण्याई त्यांच्या पाठीशी उभी असते. तसेच त्यांच्यावर असणाऱ्या संस्कार व सहवास यांचाही त्यांच्या मोठेपणातील वाटा नाकारता येत नाही. या सर्वांच्या एकत्रित येण्यामुळे मनुष्य मोठा होत असतो.

अशा गुणी व्यक्तींची कदर समाज निश्चितपणे करतो. कालिदास म्हणतो,

"पदं हि सर्वत्र गुणैर्निधीयते" [रघु. सर्ग ३/६२]

– "खऱ्या गुणांचा परिणाम कोणावरही आणि कोठेही होतोच. मित्रांप्रमाणे शत्रूवर सुध्दा हा परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. म्हणूनच रघु इंद्राला जिंकू शकत नसला तरी त्याची जिद्द, त्याची चिकाटी आणि त्याचा बालवयातीलही तो पराक्रम पाहून इंद्रालाही त्याचे कौतुक वाटल्याशिवाय राहिले नाही. म्हणजेच गुणी मनुष्य मग तो मित्र असो वा शत्रू त्याच्याविषयी मनातल्या मनांत कां होईना पण कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही. आणि अशा आपल्या गुणांची दखल समाजाने घ्यावी असे प्रत्येक व्यक्तीलाच वाटत असते. आणि अशी दखल समाजाने न घेतल्यास त्या व्यक्तीला वाईट वाटणे ही साहजिकच आहे. या बाबतीत आपल्याला भवभूतीचे उदा. घेता येईल. आपल्या नाट्यकौशल्याचा त्याला

पूर्ण अभिमान असला तरी, आपल्या नाटयकृती या तत्कालीन चिकित्सकांच्या पसंतीस न उतरल्यामुळे या बद्दलची खंत भवभूतीने आपल्या ग्रंथात व्यक्त केली आहे. याचा अर्थच असा की, आपल्या गुणांची कदर कोणी ना कोणी करावी हा मानवी स्वभाव आहे. आणि अशी कदर करणारी व्यक्ती जर थोर असेल तर मग काय विचारता ! याबद्दल कालिदास म्हणतो,

प्राय: प्रत्ययमाधत्ते स्वगुणेषूत्तमादर: । कुमार. ६/२०

– "थोर लोकांनी आपल्या गुणांचा आदर केला तरच सामान्य माणसांना आपल्या गुणवत्तेबद्दल विश्वास वाटतो."

यामुळेच पार्वतीला रीतसर मागणी घालण्याची कामगिरी जेव्हां शंकर सप्तर्षींच्यावर सोपवतो तेव्हां त्यांना अतिशय आनंद होतो, आणि ते शंकराला म्हणतात कीं, तूं या बोलावण्याने आम्हाला जे महत्त्व दिले आहेस त्यायोगे "आम्ही कोण आहोत" अशी आम्हाला जाणीव झाली आहे.

तसेच पार्वतीला रीतसर मागणी घालण्यासाठी सप्तर्षींना मध्यस्थ करण्याचे कारण कालिदासाने असे दिले आहे की,

"विक्रियायै न कल्पन्ते सम्बन्धा: सदनुष्ठिता:" कुमार ६/२९

– "सज्जन आणि संभावित पुरुषांनी घडवून आणलेले सम्बन्ध पुढे कधीच बिघडत नाहीत."

खरोखर अलिकडच्या काळांत विवाह म्हणजे खेळ समजणाऱ्या व पटत नसल्यास लगेच घटस्फोट घेणाऱ्या पती–पत्नींना हा एक महत्त्वाचा उपदेशच कवीने केला आहे. विवाह म्हणजे खेळ नसून ते एक पवित्र बंधन आहे. या बंधनाने पती–पत्नी जन्मभर एकमेकांशी बांधले जातात. तेव्हां असा हा विवाह पूर्ण विचारांती, अनुभवी व्यक्तींच्या मध्यस्थीनेच झाला पाहिजे, असे कालिदासाचे मत आहे. आणि अशा प्रकारे थोरामोठयांची संमति न घेता परस्पर विवाहाचा निर्णय घेणाऱ्या व्यक्तींची अशी अवस्था

होते हे ही शकुंतलेच्या माध्यमातून कवीने सांगितले आहे. याचा अर्थ प्रेमविवाहाला कालिदासाचा विरोध होता असे नाही, पण वधू-वरांनी परस्परांना प्रथमच जरी पसंत केले असले तरी विवाहासाठी घरच्या वडील-धाऱ्या मंडळींची संमति आवश्यक आहे असे कालिदासाला वाटते. यामुळे शंकर-पार्वती यांनी परस्परांना पसंत केले असले तरी रीतसर पार्वतीला मागणी घालण्यासाठी शंकराने सप्तर्षींना पाठविले.

गुणावगुणांच्या बाबतीत कालिदासाने आपखीही आपली कांही तत्त्वे उधृत केली आहेत. त्यातील एक तत्त्व असे -

प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङ्मुखी विश्वसृज: प्रवृत्ति: ।

[कुमार ३/२५]

- "गुणाला सर्वांगीण परिपूर्णता आणण्याला विधात्याचे मन बहुधा प्रतिकूलच दिसते."

म्हणजे, कोठे एक गुण असला कीं तेथे दुसरे कांही उणे असायचेच. कोणतीही व्यक्ती वा वस्तू सर्वगुणसंपन्न नसते. एखादी व्यक्ती हुशार असेल तर सुंदर नसेल, दुसरी एखादी सुंदर असेल पण बुद्धिमान नसेल, एखादी गुणवान असेल पण दरिद्री असेल, तर दुसरी एखादी अगुणी व्यक्ती धनवान असेल. याचा अर्थच असा कीं, विधाता प्रत्येकामध्ये कांही ना कांही अपूर्णता ठेवतो.

तरीही अनेक गुणांमध्ये एखादा दोष सहज लपून जातो असे चंद्राच्या दृष्टान्ताद्वारा कालिदासाने आपल्याला सांगितले आहे. तो म्हणतो -

एको हि दोषो गुणसंनिपाते निमज्जतीन्दो: किरणेष्विवाङ्क: ।

[कुमार. १/३]

- चंद्राच्या [असंख्य] किरणांमध्ये जसा एखादा डाग तसा माणसाच्या [अनेक] गुणांच्या समुदायांत [त्याचा] दोष सहज झाकून जातो.

या सर्व श्लोकार्थावरून प्रत्येक गोष्टीचे कालिदास किती सूक्ष्मपणे परीक्षण करीत असे हे आपल्याला कळते, आणि त्याच्या बुध्दिचे नवल वाटल्याशिवाय राहात नाही. विचारपूर्वक प्रत्येक गोष्टीचे अवलोकन करून त्यातून एखादे तत्त्व शोधून काढण्याचे त्याचे हे कसब खरोखर अलौकिक आहे. म्हणूनच तर त्याला "तत्त्वज्ञ" हे विशेषण शोभते.

गुणी व्यक्तींच्याप्रमाणे अगुणी किंवा मूर्ख व्यक्तींचीही कालिदासाने दखल घेतली आहे, आणि त्यांच्या विषयीचीही आपली कांही तत्त्वे प्रतिपादित केली आहेत. या मूर्खांच्या बुध्दिविषयी कालिदास म्हणतो, -

"पण्डितपरितोषप्रत्यया ननु मूढा जातिः । मालविका . २

– "मूर्खांची जात ही खरोखर पंडितांच्या संतोषावर विश्वास ठेवते." या व्यक्तींच्याजवळ स्वतःची अशी स्वतंत्र विचारशक्ति नसल्यामुळे या व्यक्ती नेहमी बुध्दिमान व्यक्तींच्या म्हणण्याला रुकार देतात. [ज्याप्रमाणे "मालविकाग्निमित्रम्"नाटकांत विदूषक. ] आणि यामुळेंच कीं काय, यांची बुध्दी स्थिर नसते असे कालिदासाला वाटते, म्हणून तो म्हणतो, -

पुराणमित्येव न साधु सर्व
न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ।
सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते
मूढः परप्रत्ययनेयबुध्दिः ।। मालविका. १/२

– सगळेच [काव्य] जुने म्हणून चांगले नसते. तसेच नवीन म्हणूनच केवळ कांव्य निंद्यला पात्र [अवद्य] नसते. चांगले किंवा शहाणे लोक परीक्षा करून कोणत्यातरी एकाला मानतात. मूर्खांची बुध्दी मात्र दुसऱ्यांच्या मताप्रमाणे हेलकावे खाणारी असते.

याचा अर्थच असा कीं, माणसाने प्रत्येक गोष्ट बुध्दिवर घासून, पुसून, तावून, सुलाखून मगच मान्य केली पाहिजे. परमेश्वरानें बुध्दीची देणगी मानवाला दिली ती कशासाठी ? स्वढयासाठीच नां ? या बुध्दिचा उपयोग प्रत्येक व्यक्तीने केला पाहिजे, आणि चांगल्या वाईटाची

पारख करण्यांत शिकले पाहिजे या जगांत आपल्याला सर्वत्रच एक गोष्ट दिसून येते, ती म्हणजे, जुनी पिढी ही नेहमीच प्रत्येक बाबतीत तरुण पिढीला नांवे ठेवत असते. तसेच तरुण पिढी ही नेहमी जुन्या पिढीची टिंगल करीत असते. पण हे योग्य नाही. दोनही पिढीतील व्यक्तींनी आपला अट्टाहास सोडून एकमेकांमधील चांगल्या गुणांचा स्वीकार केला तर होणारे वाद टळतील व घराघरांतील अशांतता नष्ट होईल, असा संदेश कालिदासाला या श्लोकातून द्यावयाचा आहे.

अशा रीतीने कालिदासाने या जीवनांतील बारीकसारीक गोष्टींचा चिकित्सापूर्ण विचार केला आहे. चौकस दृष्टीकोनातून जीवनाचे दर्शन घेतले आहे. आणि त्यातून त्याला सारभूत असे जे विचार स्फुरले ते त्यांनी आपल्या ग्रंथात स्पष्टपणे प्रतिपादिले आहेत. हे त्याचे विचार, त्याचे सिध्दान्त त्याच्या बुध्दिमत्तेची साक्ष देणारे आहेत. त्याच्या दीर्घ आणि दिव्य दृष्टीची साक्ष पटविणारे आहेत. यादृष्टीने आपणांही पुढील कांही उदाहरणे पाहण्यासारखी आहेत.

१] उत्सवप्रिया: खलु मनुष्या: । अभि. शां. ६
-"मनुष्ये ही खरोखर उत्सवप्रिय असतात."

२] वयोरूपविभूती नामेकैकं मदकारणम् । [रघु. १७/४३]
-"तरुण वय, सुंदर रूप, ऐश्वर्य यापैकी एकेक देखील मनुष्यांला उन्मत्त करु शकतात."

३] "न कामवृत्तिर्वचनीयमीक्षते" [कुमार ५/८२]
-"आपल्या मनाला पटेल आणि मानेल तसे वागणारा [निश्चयी] माणूस जननिंदेची मुळीच पर्वा करीत नाही."

४] ज्वलति चलितेन्धनोऽग्निर्विप्रकृत: पुन्नग: फणां कुरुते ।
प्राय: स्वं महिमानं क्षोभत्प्रतिपद्यते हि जन: ।। [अभि. शां. ६/३१]
-"इंधन चाळवलं म्हणजे अग्नि भडकतो, डिवचलं म्हणजे साप फणा उभारतो, बहुधा असं होतं कीं, मनाचा संताप झाला म्हणजेच माणसाचा प्रभाव

दिसून येतो."

५] " आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया ।  [रघु. १४/४६]

- "वडीलधा-या व्यक्तींची आज्ञा ही अविचारणीय असते."

६] स्थातुं नियोक्तुर्न हि शक्यमग्रे विनाश्य रक्ष्यं स्वयमक्षतेन ।

[रघु. २/५६]

- "रक्षणासाठी दिलेल्या वस्तूचा विनाश झाला तरी जो अंगचोरपणा किंवा अंगराखूपणा करतो त्याला आपले तोंड धन्यास दाखविणे शक्य नसते."

७] अभ्यर्थनाभङ्गभयेन साधुर्माध्यस्थ्यमिष्टेऽप्यवलम्बतेऽर्थे ।  [कुमार. १/५२]

- "आपण दुस-याला केलेली विनंती कदाचित् त्याजकडून [झिडकारली] नाकारली जाईल या भीतिने मानी माणूस इष्ट वस्तूबद्दलहि उदासीन राहतो."

अशी अनंत उदा. कालिदासाच्या ग्रंथात आपल्याला पावलोपावली आढळून येतील. ही सर्व उदा. कालिदासाच्या मानवी मनाच्या अभ्यासाची द्योतक आहेत. जीवनाच्या अथांग सागरात बुडी मारून त्याचा तळ गाठणारा आणि मानवी मनाच्या अंतरंगाचा शोध घेणारा हा कवि सर्वसामान्य नाही असे म्हणूनच म्हणावे असे वाटते. जीवनातील सर्व ऐश्वर्याचा, सुखाचा उपभोग घेणारा हा कालिदास जीवनाची गहनता आणि गांभीर्यही जाणणारा होता हे या सर्व उदा. वरून दिसून येते. अशा रीतीने प्रत्येक गोष्टीतील शाश्वतमूल्ये शोधून काढणा-या कालिदासाला म्हणूनच "तत्त्वज्ञ" म्हणणे सार्थ होईल.